# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

आपल्या देशात ज्या पायाभूत सुविधांचा विचार केला जातो त्यात प्रामुख्याने एक नवी योजना सुरु झाली आहे. आणि ती म्हणजे सुशिक्षित पण बेकार तरुणांना स्वयं-रोजगार पुरविण्यासाठी केलेली एक राष्ट्रीय योजना होय. देशातील बेकारीचे उच्चाटन करण्यासाठी सरकारतर्फे अगोदरच दुसऱ्या अनेक योजना हाती घेण्यात आल्या आहेत. यातील उल्लेखनीय अशा, समन्वित ग्रामीण विकास योजना, ग्रामीण युवकांना स्वयं - रोजगार प्रशिक्षण, ग्रामीण रोजगार कार्यक्रम वगैरे योजनांच्या अंतर्गत झालेल्या कार्याचा परिणाम आपणास दिसून येत आहे. असे असले तरी देशातील सुशिक्षित बेकारांना स्वयं-रोजगाराची अधिक क्षेत्रे उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. पगारी नोकऱ्यांचा विचार करता, त्यात केवळ विशिष्टमर्यादेपर्यंतच संधी मिळते. म्हणूनच उत्साही बेकार तरुण-तरुणींना उद्योग, देखभाल सेवा आणि व्यापार क्षेत्र यात अग्रक्रमाने स्वयं-रोजगाराच्या दृष्टीने अधिक क्षेत्रे निर्माण करणासाठी आवश्यक उपाय योजण्याची तातडीची गरज भासू लागली. सरकारतर्फे स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा औद्योगिक केंद्रांतून प्रत्येक पात्र उद्योजकाला संकल्पित कर्ज घेण्यासाठी मदत देण्यात येत आसे आढळते.

देशातील सुशिक्षित बेकार तरुणांनी उद्योग, देखभाल सेवा आणि व्यापार या क्षेत्रांत, आवश्यक समन्वित मदत घेऊन स्वयं-रोजगार उभारावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. देशातील शालेय शिक्षण घेऊन पास झालेल्या सर्व सुशिक्षित बेकार तरुणांना या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे असे दिसून येते.